# अर्थशास्त्र

## बी.ए. द्वितीय वर्ष (सेमिस्टर IV)

- डॉ. प्रज्ञा बागडे

## केंद्रिय अधिकोषाची कार्ये
## (Functions of Cental Bank)

देशाच्या अधिकोषण प्रणालीत केंद्रिय अधिकोषाचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. आज जवळ जवळ सर्व देशांमध्ये केंद्रिय अधिकोष स्थापन झालेल्या आहेत. अर्थव्यवस्थेत कार्यरत असणाऱ्या वेगवेगळ्या अधिकोषावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्यांच्या कार्यात सुसूत्रता आणण्यासाठी एका केंद्रिय अधिकोषाची आवश्यकता असते. देशाच्या संतुलित आर्थिक विकासासाठी योग्य अशा आर्थिक धोरणांची आखणी आणि अंमलबजावणी करण्याचे कार्य केंद्रिय अधिकोष करते. देशाच्या हितासाठी आणि विकासासाठी विविध योजना केंद्रिय अधिकोष राबवित असते. केंद्रिय अधिकोष देशातील बँक व्यवस्थेला, चलन व्यवस्थेला व एकंदरीत अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त करुन देण्याचे महत्वाचे कार्य केंद्रिय अधिकोष करीत असते.

'बँक ऑफ इंग्लंड' ही जगातील पहिली केंद्रिय अधिकोष समजली जाते. त्यानंतर बँक ऑफ रशिया, 'बँक ऑफ जपान' या बँकांनी देखील केंद्रिय अधिकोषाची कार्ये करण्यास सुरुवात केली. त्यानंतर इतर देशांमध्ये देखील केंद्रिय अधिकोष स्थापन झाले. इ. स. १९२० मध्ये ब्रुसेल्स या शहरात आंतरराष्ट्रीय वित्त संमेलन घेण्यात आले. या संमेलनानंतर केंद्रिय अधिकोषाच्या विकासाला चालना मिळाली. भारतातही १९३५ मध्ये केंद्रिय अधिकोष म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (R.B.I.) ची स्थापना करण्यात आली.

**केंद्रिय अधिकोषाची व्याख्या (Definitions of Central Bank)-**

वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञांनी केंद्रिय अधिकोषाच्या वेगवेगळ्या व्याख्या दिलेल्या आहेत.

**आर. जी. हॉट्रे यांच्या मते,** 'सर्वच बॅकाचा अंतिम ऋणदाता म्हणून कार्य करणाऱ्या अधिकोषाला केंद्रिय अधिकोष असे म्हणतात.

**सेयर्स यांच्या मते,** 'व्यापारी अधिकोषांना नियंत्रित करणारी संस्था म्हणजे केंद्रिय अधिकोष होय'

**क्राऊथर यांच्या मते,** 'बॅकांचा जनतेशी जसा संबंध असतो, तसेच केंद्रिय बॅकेचा इतर बॅकाशी संबंध असतो.'

**केंद्रिय अधिकोषाची समर्थक व्याख्या पुढील प्रमाणे**

"देशातील अधिकोषण व मुद्रामान पद्धतीचे नियंत्रण करुन तिच्यात स्थैर्य प्रस्थापित करणारी अग्रणी अधिकोषीय व मौद्रिक संस्था म्हणजे केंद्रिय अधिकोष होय."

केंद्रिय अधिकोषाची वैशिष्ट्ये

१) प्रत्येक देशांमध्ये एक केंद्रिय अधिकोष असते आणि ती देशाची सर्वोच्च वित्तीय संस्था असते.

२) केंद्रिय अधिकोषाचा उद्देश नफा कमाविणे नसून देशातील अधिकोषण व्यवस्थेचा विकास करुन अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त करुन देणे हा असतो.

३) केंद्रिय अधिकोष व्यापारी अधिकोषांशी स्पर्धा करत नाही प्रसंगी त्यांना मदतही करते.

**केंद्रिय अधिकोषाचे महत्व (Importance of Central Bank)-**

देशाचा आर्थिक विकास करत असतांना देशातील मुद्रा व प्रत्यय या दोन गोष्टी अत्यंत महत्वाच्या असतात. या दोन गोष्टींवरच त्या देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो. त्यामुळे मुद्रा व प्रत्यय याची देवघेव करणाऱ्या संस्थांना विशेष महत्व प्राप्त होते. या संस्थांनी जर नफा मिळविण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून कार्य केले तर आर्थिक विकास तर होणार नाही त्या सोबत समाजाच्या कल्याणाकडेही दुर्लक्ष होऊ शकते. त्यामुळे भारतातील अधिकोषण पद्धतीत सुधारणा घडवून आणणे व सर्व अधिकोषांच्या आर्थिक व्यवहारात समानता आणण्याचे कार्य केंद्रिय अधिकोष करित असल्यामुळे आधुनिक काळात केंद्रिय अधिकोषाला विशेष महत्व प्राप्त झाले. केंद्रिय अधिकोष सर्व अधिकोषांच्या कार्यावर नियंत्रण ठेवते, देशाच्या चलन पद्धतीवर नियंत्रण ठेवून त्यात सुलभता आणते. देशातील पतपैशासंबंधीचे धोरण ठरवून अंतर्गत व आंतरराष्ट्रीय मूल्य स्थिर ठेवते. सरकारच्या वतीने अधिकोषण विषयक सर्व कार्य करते. सरकारला वेळोवेळी सल्ला देते. त्यामुळे केंद्रिय अधिकोषाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

**केंद्रिय अधिकोषाची कार्ये (Functions of Central Bank)-**

भारतीय केंद्रिय अधिकोष भारताच्या विकासासाठी पुढील कार्य करते. केंद्रिय अधिकोषाच्या कार्याचे पुढील प्रमाणे वर्गीकरण करता येते.

i) नियमन व नियंत्रण विषयक कार्ये

ii) आर्थिक विकास विषयक कार्ये

**i) नियमन व नियंत्रण विषयक कार्ये**

**पत्रचलनाच्या निर्गमनाचा एकाधिकार (Monopoly of Bank Note Issue)-**

देशात पत्रमुद्रेचे निर्गमन करणे हे केंद्रिय अधिकोषाचे अत्यंत महत्वाचे कार्य आहे. श्रीमती व्हेरा स्मिथ यांनी या कार्याला केंद्रिय अधिकोषांच्या कार्यांचा केंद्रबिंदू मानले आहे. पूर्वी व्यापारी अधिकोषांना कागदी चलन किंवा नोटा छापण्याचा एकाधिकार होता परंतु त्यात अनेक दोष दिसून आल्यामुळे सरकारने पत्रमुद्रा निर्गमनाचा अधिकार स्वतःकडे घेतला. परंतु सरकारच्या पत्रमुद्रा निर्गमनात लवचिकतेचा अभाव दिसून आला. त्यामुळे हे कार्य करण्यासाठी केंद्रिय अधिकोष हाच योग्य अधिकोष असल्याचे लक्षात आले. जगातील बहुतेक सर्व देशांमध्ये पत्रमुद्रांचे निर्गमन करण्याची मक्तेदारी त्या देशातील केंद्रिय अधिकोषाकडे आहे. केंद्रिय अधिकोषाला २ रुपयापासून तर १००० रु. किमती पर्यंतच्या नोटा छापण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

पत्रमुद्रा निर्गमन करण्याचा एकाधिकार केंद्रिय अधिकोषाला प्राप्त झाल्यामुळे पुढील फायदे होतात.

अ) देशाच्या मौद्रिक व्यवस्थेत एकसुत्रता, सुरक्षितता, सार्वत्रिकता निर्माण होते.

ब) मुद्रा पुरवठ्यात योग्य प्रमाणात लवचिकता साधता येते व देशाच्या गरजेनुसार चलन पुरवठा करता येतो.

क) देशातील चलन लोकांच्या विश्वासाला पात्र ठरतात

ड) व्यापारी अधिकोषांच्या प्रत्यय निर्मितीवर नियंत्रण प्रस्थापित करता येते.

इ) देशातील मुद्रेच्या मूल्यात व विनिमय दरात स्थैर्य राखता येते.

ई) पत्रचलन निर्गमनामुळे सरकारला फायदा होतो.

फ) देशातील किमतीच्या पातळीवर नियंत्रण ठेवता येते.

**२) सरकारचा अधिकोष (Government Bankers)-**

केंद्रिय अधिकोष सरकारचा अधिकोष म्हणून कार्य करतो. व सरकारचे आर्थिक व्यवहारही सांभाळतो. सरकारचा अधिकोष या नात्याने केंद्रिय अधिकोषाला पुढील कार्ये पार पाडावी लागतात.

**अ) सरकारी जमा खर्च -** सरकारच्या वतीने लोकांकडून कर, दंड इत्यादी मार्गांनी मिळणारा पैसा गोळा करणे तसेच सरकारी खर्चाची व्यवस्था पाहाणे.

**ब) सरकारी कोष सांभाळणे -** सरकारच्या ठेवी सांभाळणे व सरकारी कोषाचा हिशोब ठेवण्याचे काम करावे लागते.

**क) अल्पकालीन ऋण देण -** सरकारला गरज पडल्यास अल्पकालीन ऋण देणे.

**ड) सरकारी ऋणाचे प्रबंधन -** नवे ऋण निर्गमित करणे, जुन्या ऋणाचे परिवर्तन करणे, ऋणाच्या व्याजाचे शोधन करणे व त्या संबंधीची सर्व व्यवस्था पाहाण्याचे काम करावे लागते.

**इ) सरकारी कोषाचे स्थानांतरण (रकमा पाठविणे) -** एका राज्यातून दुसऱ्या राज्यात किंवा परदेशात रकमा पाठविण्याची सोय करणे.

**फ) आर्थिक सल्ला देणे -** सरकारला वेळोवेळी आर्थिक व्यवहारांबाबत सल्ला देण्याचे व मार्गदर्शन करण्याचे कार्य केंद्रिय अधिकोषाला करावे लागते. या कार्याबद्दल केंद्रिय अधिकोषाला कमिशन मिळते.

### ३) अधिकोषांचा अधिकोष (Banker's Bank)-

देशातील जनतेचे अधिकोषांशी जसे संबंध असतात तसेच व्यापारी अधिकोषांचे केंद्रिय अधिकोषांशी संबंध असतात. केंद्रिय अधिकोष व्यापारी अधिकोषांचा स्पर्धक नसून मार्गदर्शक, सहाय्यक असतो. या दृष्टीने केंद्रिय अधिकोष हा अधिकोषांचा अधिकोष म्हणून खालील कार्ये करतो.

प्रत्येक व्यापारी अधिकोषाला कायद्यानुसार आपल्याजवळील एकूण रोख रकमेपैकी काही रोकड केंद्रिय अधिकोषजवळ ठेवावी लागते. या रोख रकमेचा खालील प्रमाणे उपयोग करता येतो.

१) या रोख रकमेतून केंद्रिय अधिकोष व्यापारी अधिकोषांना संकटाच्या काळात मदत करतो.

२) या रोख रकमेच्या माध्यमातून केंद्रिय अधिकोष प्रत्यय नियंत्रणाचे कार्य प्रभावीपणे करु शकतो.

३) केंद्रिय अधिकोषाने व्यापारी अधिकोषाची रोकड बाळगल्यामुळे देशातील रोख निधीची बचत होते

४) रोख रकमेच्या माध्यमातून अधिकोषांच्या परस्पर (धनादेशाच्या) देण्याघेण्याची सोय लावणे सुलभ जाते. यामुळे धनादेशाच्या उपयोगाला उत्तेजन मिळून समाशोधन गृहाचा विकास घडून येण्यास मदत झाली.

### ४) अंतीम ऋणदाता (Lender of the Last Resort)-

केंद्रिय अधिकोष देशातील अधिकोषण व्यवस्थेचा केंद्रबिंदू असल्यामुळे देशातील व्यवस्थेला सुरक्षित ठेवण्यासाठी व्यापारी अधिकोषांना त्याच्या संकटाच्या वेळी मदत करते हे

केंद्रिय अधिकोषाचे कर्तव्य असते. म्हणून बेजहॉट यांनी केंद्रिय अधिकोषाला 'निर्वाणीचा अंतिम ऋणदाता' म्हटले आहे. जेव्हा एखाद्या मोठ्या रकमेची मागणी पूर्ण होत नसेल तर व्यापारी अधिकोष एकदम केंद्रिय अधिकोषाकडे धाव न घेता इतर साधनांद्वारे रक्कम उभी करण्याचा प्रयत्न करतात परंतु हे करुनही रकमेची मागणी पूर्ण होत नसेल तर शेवटी व्यापारी अधिकोष केंद्रिय अधिकोषाकडे धाव घेतात. आंत्यतिक गरज असल्याशिवाय प्रत्येकवेळी मदत मागू नये म्हणून मदतीचा हा दर महाग ठेवला जातो. ही मदत दोन प्रकारे केली जाते.

अ) व्यापारी अधिकोषाच्या श्रेष्ठ दर्जाच्या हुंड्या किंवा रोखे पुन्हा वटवून देतो.

ब) व्यापारी अधिकोषाला हुंडी वटविण्याच्या दराने अल्पकालीन कर्ज देते.

**केंद्रिय अधिकोषाच्या या कार्यामुळे अर्थव्यवस्थेला पुढील फायदे होतात.**

i) व्यापारी अधिकोष स्वत:जवळ कमी रोख निधी ठेवूनही प्रत्यय निर्मिती वाढवू शकतो.

ii) संकटाच्या वेळी व्यापारी अधिकोषांना केंद्रिय अधिकोषाकडून आर्थिक मदत मिळते हे माहित असल्यामुळे जनतेचा अधिकोषावरील विश्वास अधिक दृढ होतो.

iii) देशाच्या बॅकींग व्यवस्थेवर केंद्रिय अधिकोषाचे नियंत्रण राहते.

**५) समाशोधन कार्य (Working of Clearning House)-**

निरनिराळ्या अधिकोषांवर निर्माण होणारी देण्याघेण्याची वजावट करणे म्हणजे समाशोधन होय. केंद्रिय अधिकोष व्यापारी अधिकोषांसाठी व धनादेशाचा वापर वाढविण्यासाठी समाशोधन गृहाची व्यवस्था करतो. ग्राहक दुसऱ्यांची देणी फेडण्यासाठी आपल्या अधिकोषावर धनादेश काढतो. हे धनादेश ज्या व्यक्तीला मिळतात ती व्यक्ती तो धनादेश वसुलीसाठी आपल्या अधिकोषात जमा करतो. अशा रितीने धनादेशाचा वापर केल्यामुळे व्यापारी अधिकोषांमध्ये देणी घेणी निर्माण होते. ही देणी घेणी समाशोधन

गृहामार्फत परस्पर वजावट करुन फेडली जातात. त्यामुळे रोख रकमेची बचत होत. व अधिकोषाची प्रत्यय निर्मितीची क्षमता वाढते.

### ६) प्रत्यय नियंत्रण (Credit Control)-

व्यापारी अधिकोषाचे महत्वाचे कार्य म्हणजे प्रत्यय निर्मिती करणे. व्यापारी अधिकोषांनी अत्यंत जास्त प्रमाणात प्रत्यय निर्मिती करणे व अत्यंत कमी प्रमाणात प्रत्यय निर्मिती करणे अर्थव्यवस्थेसाठी घातक असते. अर्थव्यवस्थेला आवश्यक तेवढीच प्रत्यय निर्मिती झाली पाहिजे यासाठीच व्यापारी अधिकोषांच्या प्रत्यय निर्मितीवर केंद्रिय अधिकोषाला नियंत्रण ठेवावे लागते. यामुळे देशातील किंमत पातळीचे नियंत्रण होऊन व्यापार चक्रापासून अर्थव्यवस्थेचे रक्षण होऊ शकते. हे कार्य करण्यासाठी केंद्रिय अधिकोषाला निरनिराळ्या साधनांचा वापर करावा लागतो. उदा. रोख्यांची खरेदी विक्री करणे, कोष अनुपातात परिवर्तन करणे, प्रत्ययाचे वाटप, नैतिक प्रभाव, अधिकोष दरात बदल करणे इत्यादी साधनांचा उपयोग करावा लागतो.

### ७) सुवर्ण कोषांचे आणि विनिमय कोषांचे संरक्षण (Protection of Gold Fund and Foreign Exchange Fund)-

देशाच्या संपूर्ण सुवर्ण कोषांचे तसेच विदेशी चलनाच्या कोषांचे संरक्षण करण्याची जबाबदारी केंद्रिय अधिकोषाची असते. विदेशी व्यापाराच्या स्थैर्यासाठी विनिमय दरात स्थिरता असणे आवश्यक असते. जेव्हा विनिमय दर वाढतो तेव्हा केंद्रिय अधिकोष विदेशी चलनाची खरेदी करतो व जेव्हा विदेशी विनिमय दरात घट होते तेव्हा केंद्रिय अधिकोष विदेशी चलनाची विक्री करते. अशा प्रकारे विदेशी चलनाची खरेदी विक्री करुन केंद्रिय अधिकोष विनिमय दरात स्थिरता आणण्याचा प्रयत्न करतो.

**८) आर्थिक आणि मौद्रिक व्यवहारासंबंधी आकडेवारी एकत्रित करणे. (Collection of Data Regarding Economic and Monetary Functions)-**

केंद्रिय अधिकोष देशाच्या आर्थिक व मौद्रिक व्यवहारासंबंधी आकडेवारी संकलीत करुन ती आकडेवारी नियमित प्रकाशित करण्याचे काम करतो. भारतात रिझर्व्ह बँक अशा माहितीने परिपूर्ण असलेले रिझर्व्ह बॅंक बुलेटिन नावाचे मासिक प्रकाशित करते. या आकडेवारीवरुन देशाच्या अर्थव्यवस्थेसंबंधी महत्वपूर्ण माहिती प्राप्त होते.

**ii) आर्थिक विकास विषयक कार्ये**

**(Functions Regarding Economic Development)-**

आधुनिक काळात अनेक राष्ट्रांमध्ये आर्थिक विकासाचे अनेक कार्यक्रम हाती घेण्यात आलेले आहेत. हे कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडून आर्थिक विकास करण्यासाठी केंद्रिय अधिकोषाला अत्यंत महत्वाची व सक्रिय भूमिका पार पाडावी लागते. त्या संदर्भात काही विकासविषयक कार्ये सुद्धा केंद्रिय अधिकोषाला पार पाडावी लागतात ती पुढीलप्रमाणे.

१) देशाच्या आर्थिक विकासासाठी सुसंघटीत अधिकोषण पद्धती असणे आवश्यक असते आणि अशी सुसंघटीत अधिकोषण पद्धती स्थापन करण्यासाठी केंद्रिय अधिकोषाला प्रयत्न करावे लागतात.

२) आर्थिक विकासाच्या कार्यात मोठ्या प्रमाणावर भांडवल, आधुनिक तंत्रज्ञानाची आयात करावी लागते. त्यातून निर्माण होणारी देणी सहज फेडता येतील यांची व्यवस्था केंद्रिय अधिकोषाला करावी लागते.

३) आर्थिक विकासात शेती व औद्यौगिक विकास हे अत्यंत महत्वाचे असतात. शेती क्षेत्रात आवश्यक कर्ज पुरवठा व्हावा यासाठी केंद्रिय अधिकोष ग्रामीण भागात व्यापारी अधिकोषांच्या शाखा स्थापन करुन शेती क्षेत्राला पुरेसा प्रत्यय पुरवठा उपलब्ध करुन

देण्याची व्यवस्था करते तसेच औद्योगिक क्षेत्राचा जलद विकास होण्यासाठी उद्योगधंद्यांना आवश्यक असणारा प्रत्यय पुरवठा करण्यासाठी केंद्रिय अधिकोषाने औद्योगिक विकास बँकेची स्थापना केली आहे.

४) आर्थिक विकासाच्या कार्यक्रमांमुळे देशात मुद्रेच्या मागणीत मोठ्या प्रमाणात वाढ होते. केंद्रिय अधिकोष ही पत्रमुद्रेचे निर्गमन करणारी एकमेव संस्था आहे. त्यामुळे मागणीनुसार मुद्रेच्या पुरवठ्यात वाढ करण्याची व्यवस्था केंद्रिय अधिकोषाला करावी लागते.

५) आर्थिक विकास जलद गतीने होण्यासाठी गुंतवणूकीत मोठ्या प्रमाणात वाढ होणे आवश्यक असते. आणि ही गुंतवणूक खाजगी क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्र या दोन्ही क्षेत्रातून होणे आवश्यक असते. देशातून तसेच विदेशातून होणाऱ्या गुंतवणूकीला प्रोत्साहन देणाऱ्या योजना केंद्रिय अधिकोषाला आखाव्या लागतात.

६) दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढू लागल्यामुळे आंतरराष्ट्रीय आर्थिक व मौद्रिक संस्था उदा. आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी (I.M.F.) व जागतिक अधिकोष (I.B.R.D.) या संस्थांशी देशाच्या वतीने केंद्रिय अधिकोषाला संबंध ठेवावे लागतात. यातून देशाचा महत्तम फायदा कसा होऊ शकेल याचा विचार करुन योजना आखाव्या लागतात.

७) केंद्रिय अधिकोषाला व्यापारी अधिकोषांशी स्पर्धा करावयाची नसते तर व्यापारी अधिकोषांचा विकास करावयाचा असतो. केंद्रिय अधिकोषाकडे व्यापारी अधिकोषांची अशी कार्ये सोपविलेली असतात की ज्यामुळे त्यांच्यात स्पर्धा अस्तित्वात येणार नाही.

उदा. — ग्राहकांच्या बीनव्याजी ठेवी स्विकारणे, योग्य तारणावर सरकारी व गैरसरकारी संस्थांना कर्ज देणे, हुंड्या पुन्हा वटविणे, विदेशी अधिकोषांचे प्रतिनिधीत्व करणे.

अशा प्रकारे केंद्रिय अधिकोष ही अधिकोषण व्यवस्थेच्या केंद्रस्थानी असल्यामुळे केंद्रिय अधिकोषाला मोठ्या प्रमाणात कार्ये करावी लागतात.

**केंद्रिय अधिकोषाचे प्रत्यय नियंत्रण (Credit Control of Central Bank)-**

प्रत्यय निर्मिती करणे, हे व्यापारी अधिकोषाचे अत्यंत महत्वाचे कार्य होय. जर व्यापारी अधिकोषांनी योग्य रितीने प्रत्यय निर्मिती केली नाही तर व्यापारी अधिकोषाचे अस्तित्व धोक्यात येते. जर व्यापारी अधिकोषांनी आवश्यकतेपेक्षा जास्त प्रत्यय निर्मिती केली तर त्यामुळे देशात स्फिती अस्तित्वात येऊन किंमत पातळीत वाढ होते. या उलट जर आवश्यकतेपेक्षा कमी प्रत्यय निर्मिती केली तर त्यामुळे अपस्फिती निर्माण होऊन मंदी अस्तित्वात येते. देशात आर्थिक स्थैर्य प्रस्तापित करण्याच्या उद्देशाने व्यापारी अधिकोषांनी केलेल्या प्रत्यय निर्मितीवर नियंत्रण घालण्याचे कार्य केंद्रिय अधिकोषाला करावे लागते.

**प्रत्यय नियंत्रणाच्या पद्धती (Methods of Credit Control)-**

प्रत्यय नियंत्रणासाठी केंद्रिय अधिकोष निरनिराळ्या साधनांचा उपयोग करीत असते. या साधनांची स्थूल मानाने दोन गटात विभागणी केली जाते.

**१) मात्रात्मक किंवा संख्यात्मक किंवा परिमाणात्मक साधने (Quantitative Measures)-**

या साधनांमुळे देशातील एकंदर प्रत्ययाच्या मात्रेवर परिणाम होतो. व्यापारी अधिकोषांनी निर्माण केलेली प्रत्ययाची एकूण मात्रा फारच जास्त किंवा फार कमी वाटल्यास त्यात योग्य दिशेने वाढ किंवा घट करण्यासाठी केंद्रिय अधिकोष मात्रात्मक साधनांचा उपयोग करीत असते. मात्रात्मक नियंत्रणाची साधने खालील प्रमाणे

### अ) अधिकोष दर (Bank Rate)-

ज्या दराने केंद्रिय अधिकोष व्यापारी अधिकोषांच्या श्रेष्ठ दर्जाच्या हुंड्या पुन्हा वटवून देतो किंवा व्यापारी अधिकोषांना संकटाच्या वेळी आर्थिक मदत करतो त्या व्याजाच्या दराला अधिकोष दर असे म्हणतात. याच दराला हुंड्यांच्या पुर्नवटणाचा दर (Rate of Rediscounting Bills) असेही म्हणतात. व्यापारी अधिकोष ज्या दराने ग्राहकांना कर्ज देतो त्या दराला व्याजाचा दर (Market Rate of Interest) असे म्हणतात. साधारणत: बाजार दरापेक्षा अधिकोष दर थोडा जास्तच असतो. अधिकोष दर व बाजार दर यामध्ये निश्चित स्वरुपाचा संबंध असतो. अधिकोष दरामध्ये वाढ झाल्यास त्या प्रमाणात बाजार दरातही वाढ होते. आणि या उलट अधिकोष दर कमी झाल्यास त्या प्रमाणात बाजार दरातही घट होते.

केंद्रिय अधिकोषाला प्रत्ययाचा संकोच करावयाचा असल्यास अधिकोष दरात वाढ करते. अधिकोष दर वाढताच बाजाराचा दर वाढविला जातो. म्हणजे ज्या दराने व्यापारी अधिकोष आपल्या ग्राहकांना कर्ज देतात त्या दरात वाढ होते. या दरात वाढ झाल्याने ग्राहकांना कर्ज महाग वाटते. त्यामुळे कर्जाची मागणी कमी होते. अधिकोषाकडील कर्जाची मागणी कमी झाल्याने त्यांची प्रत्यय निर्मिती कमी होते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत प्रत्यय संकोच घडून येतो.

केंद्रिय अधिकोषाला प्रत्ययाचा विस्तार करावयाचा असल्यास अधिकोष दरात घट करते. अधिकोष दरात घट केल्याने बाजाराच्या दरात घट केली जाते. कर्जावरील व्याज दर घटल्याने कर्ज स्वस्त होते व अधिकोषांकडील कर्जाची मागणी वाढते. त्यामुळे प्रत्यय निर्मितीत वाढ होते व अर्थव्यवस्थेत प्रत्यय विस्तार घडून येतो.

थोडक्यात, अधिकोष दरात घट करुन केंद्रिय अधिकोष प्रत्यय विस्तार घडवून आणतो आणि अधिकोष दरात वाढ करुन प्रत्यय संकोच करतो.

**अधिकोष दर नीतीचे उद्देश -**

१) प्रत्ययाचा पुरवठा नियंत्रित करणे

२) भांडवलाच्या निर्यातीला प्रतिबंद करणे

३) विनिमय दरात अनुकूलता आणणे

४) सट्टेबाजीला आळा घालणे

५) सरकारी ऋणासाठी भूमिका तयार करणे

६) विदेशातील प्रतिकूल अधिकोष दर विफल बनविणे

७) व्यापार चक्राचे नियंत्रण करणे

**अधिकोष दर नीतीच्या मर्यादा -**

अधिकोष दर नीतीची उद्दिष्टे पूर्ण करण्यात नेहमीच यश येते असे नव्हे कारण अधिकोष दर नीतीला काही मर्यादा पडतात त्या पुढील प्रमाणे

१) अर्थव्यवस्थेत जर अनुकूल परिस्थिती नसेल तर अधिकोष दर नीती यशस्वी होत नाही.

२) केंद्रिय अधिकोषाची मदत न घेता व्यापारी अधिकोष प्रत्यय निर्मिती करीत असतील तर अधिकोष दर नीतीचा अपेक्षित परिणाम घडून येणार नाही.

३) अधिकोष दर नीती तेजीच्या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यात जेवढी यशस्वी होते तेवढी मंदीच्या काळात यशस्वी होत नाही.

४) अधिकोष दर नीतीचा उत्पादक व अनुत्पादक प्रकल्पांवर सारखाच परिणाम घडून येतो. विभेदात्मक परिणाम दिसून येत नाही.

## ब) खुल्या बाजाराचे व्यवहार (Open Market Operations)-

केंद्रिय अधिकोषाच्या प्रत्यय नियंत्रणाच्या साधनात अधिकोष दर नीतीच्या नंतर खुल्या बाजाराचे व्यवहार हे महत्वाचे साधन होय. देशातील प्रत्यय निर्मितीवर नियंत्रण घालण्यासाठी केंद्रिय अधिकोष खुल्या बाजारात रोख्यांची विक्री करतो.

केंद्रिय अधिकोषाच्या कार्यात सरकारी कर्जरोखे खरेदी व विक्री करणे या कार्याचा समावेश आहे. या अधिकाराचा उपयोग करुन अधिकोष प्रत्ययाची मात्रा कमी किंवा जास्त करु शकतो. जेव्हा केंद्रिय अधिकोषाला प्रत्यय संकोच करायचा असतो अशा वेळेस कर्जरोख्यांची विक्री सुरु करतो. किंवा प्रत्ययात वाढ करायची असल्यास खुल्या बाजारात कर्जरोखे खरेदी करतो. अशा प्रकारे प्रत्यय संकोच करण्यासाठी केंद्रिय अधिकोष खुल्या बाजारात रोख्यांची विक्री करते तर प्रत्यय विस्तार करण्यासाठी खुल्या बाजारात रोख्यांची खरेदी करते. या क्रियांना खुल्या बाजाराचे व्यवहार असे म्हणतात. अधिकोष दर नीती व खुल्या बाजारातील व्यवहार ही प्रत्यय नियंत्रणाची जुळी साधने होत.

## खुल्या बाजारातील व्यवहारांच्या मर्यादा (Limitations of Open Market Operations)-

खुल्या बाजारातील व्यवहारांचे यश हे पुढील अटींवर अवलंबून असते म्हणून त्यांना खुल्या बाजारातील व्यवहारांच्या मर्यादा असे सुद्धा म्हणतात.

### १) सुसंघटित व कार्यक्षम रोखे बाजार -

खुल्या बाजारातील रोख्यांच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारांचे योग्य तो प्रभाव पडण्यासाठी रोखे बाजार सुसंघटीत व कार्यक्षम असला पाहिजे. अन्यथा खुल्या बाजारातील व्यवहारांचा अपेक्षित परिणाम घडून येत नाही.

**२) व्यापारी अधिकोषाची अतिरिक्त रोकड बाळगण्याची प्रवृत्ती -**

जर व्यापारी अधिकोष आपल्याजवळ मोठ्या प्रमाणात रोख रक्कम बाळगत असतील तर केंद्रिय अधिकोषाचे रोखे खरेदी विक्रीचे व्यवहार यशस्वी होणार नाही

**३) रोख्यांचा पुरेसा साठा -**

केंद्रिय अधिकोषाजवळ फार मोठ्या प्रमाणात विविध प्रकारच्या रोख्यांचा साठा असणे आवश्यक असते. अन्यथा हे व्यवहार करणे केंद्रिय अधिकोषाला अशक्य असते.

**४) व्यापारी अधिकोषाचे सहकार्य -**

खुल्या बाजारातील व्यवहारांमुळे व्यापारी अधिकोषाचे रोख निधी प्रभावित होतात. त्या बदलांप्रमाणे व्यापारी अधिकोषांनी आपल्या प्रत्यय निर्मितीत योग्य तो बदल करणे आवश्यक असते.

**५) प्रत्ययाच्या मागणीतील स्थिरता -**

ग्राहकांद्वारे होणाऱ्या प्रत्ययाच्या मागणीत स्थिरता असली पाहिजे. प्रत्ययाच्या मागणीत वाढ झाल्यास अधिकोषाच्या रोख निधीत घट होते. त्यामुळे प्रत्ययाचा विस्तार होतो. या उलट प्रत्ययाच्या मागणीत घट झाल्यास अधिकोषाच्या रोख निधीत वाढ होते आणि प्रत्यय निर्मितीत घट होते.

**क) कोष - अनुपातात परिवर्तन (Changes in the Reserve Ratios)-**

प्रत्येक व्यापारी अधिकोषाला आपल्या एकूण ठेवींच्या एक निश्चित प्रतिशत रक्कम केंद्रिय अधिकोषाजवळ रोकड जमा ठेवावी लागते. ह्या प्रमाणाला राखीव निधीचे प्रमाण किंवा कोष अनुपात (Reserve Ratio) असे म्हणतात. या रोख निधीच्या प्रमाणात बदल

करण्याचा अधिकार केंद्रिय अधिकोषाला असतो. केंद्रिय अधिकोष प्रत्यय नियंत्रणासाठी कोषानुपातात परिवर्तन करीत असते. या साधनांचा सर्वात प्रथम उपयोग १९३६ मध्ये अमेरिकेत करण्यात आला.

जर देशात प्रत्यय विस्तार झाला असेल तर त्याला आळा घालण्यासाठी रोख निधीचे प्रमाण वाढवितो. त्यामुळे व्यापारी अधिकोषाजवळील रोख रकमेत घट होते. परिणामत: व्यापारी अधिकोषाची प्रत्यय निर्मिती देखील घटते. या उलट जर देशात प्रत्यय संकोच घडून आला असेल तर त्याला आळा घालण्यासाठी केंद्रिय अधिकोष रोख निधीचे प्रमाण कमी करतो. परिणामत: व्यापारी अधिकोषाजवळील रोख रकमेत वाढ होऊन व्यापारी अधिकोषांच्या प्रत्यय निर्मितीत वाढ होते. व्यापारी अधिकोष पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणावर प्रत्यय पुरवू लागतात. व प्रत्यय विस्तार घडून येतो.

**ड) प्रत्यक्ष व्यवहार (Direct Dealing)-**

सर्वसाधारण परिस्थितीत केंद्रिय अधिकोष वैयक्तिक ग्राहकांना ऋण देत नाही. काही विशिष्ट परिस्थितीत प्रत्यय विस्तार करण्यासाठी इतर साधनांचा वापर करुनही व्याज दरात घट होत नसेल तर अशा परिस्थितीत केंद्रिय अधिकोष स्वत: स्वस्त दरात ग्राहकांना ऋण उपलब्ध करुन देते व सुलभ मुद्रेची परिस्थिती निर्माण करु शकतो परंतु या साधनांचा व्याजाच्या दरात वाढ करण्यासाठी उपयोग होऊ शकत नाही.

**इ) नैतिक उपदेश (Moral Suasion)-**

केंद्रिय अधिकोष व्यापारी अधिकोषांना वेळोवेळी सल्ला देऊन त्यांची धोरणे निश्चित करुन त्यांना योग्य दिशा देण्याचे कार्य करते. केंद्रिय अधिकोष व्यापारी अधिकोषांना आपले धोरण समजावून ते देशाच्या हिताच्या दृष्टीने किती महत्वाचे आहे हे स्पष्ट करतो. तसेच

व्यापारी अधिकोषांनी किती कर्ज द्यावे, कोणत्या क्षेत्राला कर्ज द्यावे या संबंधी मार्गदर्शन करतो. अशा प्रकारे केवळ नैतिक उपदेश करुन मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला जातो.

### २) निवडक (विभेदात्मक) किंवा गुणात्मक प्रत्यय नियंत्रण (Selective OR Qualitative Credit Control)-

परिमाणात्मक प्रत्यय नियंत्रणाच्या साधनांमुळे देशातील सर्वच उद्योगांच्या प्रत्ययाच्या मात्रांवर प्रभाव पडतो. परंतु जेव्हा देशातील फक्त विशिष्ट व्यवसायातच किंवा केवळ विशिष्ट विभागातच प्रत्ययाचा पुरवठा कमी जास्त करावयाचा असतो तेव्हा मात्रात्मक साधने उपयोगी पडत नाही. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या उद्योगांना पुरेसा प्रत्यय पुरवठा व अनावश्यक असणाऱ्या उद्योगांना कमी प्रत्यय पुरवठा करणे हा गुणात्मक प्रत्यय नियंत्रणाचा उद्देश असतो.

### गुणात्मक प्रत्यय साधने

### अ) तारण कर्जाच्या सीमा निश्चित करणे

विशिष्ट प्रकारच्या मालावर ऋण देतांना अधिकोषाने किती ऋण द्यावे या संबंधी बंधने घालून देण्याचे अधिकारही केंद्रिय अधिकोषाला दिलेले असतात. अधिकोष मालावर ऋण देतांना तारणाच्या सममूल्य ऋण न देता तारणाच्या मालाच्या किमती उतरण्याच्या शक्यता विचारात घेऊन मालाच्या किमतीपेक्षा कमी प्रमाणात ऋण देतात. किमती किती कमी होतील याची संभाव्यता लक्षात घेऊन जितके कमी ऋण देण्यात येते त्या अंतराला ऋण सीमा (Margin) असे म्हणतात. कोणत्या मालावर अधिकोषांची किती ऋण सीमा असावी हा निर्णय कित्येकदा केंद्रिय अधिकोष ठरवून देतो.

**ब) ग्राहक कर्जाचे नियमन (Regulation of Consumer's Credit)-**

केंद्रिय अधिकोष देशातील मुद्रा स्फितीची परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी व्यापारी अधिकोष आपल्या ग्राहकांना देत असणाऱ्या कर्जाचे नियमन करते. कोणत्या टिकावू वस्तू खरेदी करण्यासाठी कर्ज द्यावे व कोणत्या वस्तूकरिता कर्ज देऊ नये याची सूचना केंद्रिय अधिकोष व्यापारी अधिकोषांना देत असते. तेजीच्या परिस्थितीत वाढत जाणाऱ्या किंमत पातळीला आळा घालण्यासाठी ही पद्धती अत्यंत उपयुक्त ठरली आहे.

**क) प्रत्ययाचे वाटप नियंत्रण (Rationing of Credit)-**

विविध प्रकारच्या मालावर ऋण देतांना अधिकोषांनी कोणत्या प्रकारच्या मालावर एकूण अग्रिमापैकी किती प्रतिशत अग्रिम द्यावा हे ठरविण्यात येते. अशा प्रकारे वेगवेगळ्या उद्योग व्यवसायांना देण्यात येणारा प्रत्यय हिस्सा कमी जास्त करुन केंद्रिय अधिकोष विभेदात्मक प्रत्यय नियंत्रण करीत असते.

**ड) नैतिक प्रभाव (Moral Impact)-**

केंद्रिय अधिकोष व्यापारी अधिकोषांना वेळोवळी प्रत्यय नियंत्रण करण्याच्या दृष्टीने सल्ला देत असते. जर देशात प्रत्ययाचा विस्तार झाला असेल तर व्यापारी अधिकोषांना प्रत्यय संकोच करण्याचा सल्ला देते या उलट मंदीच्या परिस्थितीत प्रत्यय विस्ताराचा सल्ला देते. केंद्रिय अधिकोषाच्या या आदेशांचे पालन करणे व्यापारी अधिकोषांचे हे नैतिक कर्तव्य असते.

**इ) प्रत्यक्ष कारवाई (Direct Action)-**

एखाद्या व्यापारी अधिकोषाने केंद्रिय अधिकोषाच्या आदेशांचे पालन न केल्यास त्या अधिकोषावर केंद्रिय अधिकोष प्रत्यक्ष कारवाई करते. या कारवाईत केंद्रिय अधिकोष व्यापारी

अधिकोषांच्या नव्या ठेवी स्वीकारण्यास तसेच कोणतेही व्यवहार करण्यास विशिष्ट कालावधीसाठी बंदी घालते. अशा प्रकारे केंद्रिय अधिकोष त्या व्यापारी अधिकोषाला आपल्या आदेशांचे पालन करण्यास भाग पाडते.

## अपेक्षित प्रश्न

### दिर्घोत्तरी प्रश्न

१. केंद्रिय अधिकोषाची कार्ये स्पष्ट करा.

२. केंद्रिय अधिकोषाच्या प्रत्यय नियंत्रणार्थ वापरण्यात येणाऱ्या मात्रात्मक (संख्यात्मक) साधनांची चर्चा करा.

३. केंद्रिय अधिकोषाच्या प्रत्यय नियंत्रणार्थ वापरण्यात येणाऱ्या विभेदात्मक (निवडक) साधनांची चर्चा करा.

### लघुत्तरी प्रश्न

१. अंतिम ऋणदाता या नात्याने केंद्रिय अधिकोषाचे कार्य स्पष्ट करा.

२. केंद्रिय अधिकोषाला सरकारचा अधिकोष का म्हणतात.

३. केंद्रिय अधिकोषाची आर्थिक विकास विषयक कार्ये कोणती.

४. अधिकोषांचा अधिकोष असे केंद्रिय अधिकोषाला का म्हणतात.

५. अधिकोष दराचा प्रत्यय निर्मितीवर कसा परिणाम होतो.

६. अधिकोष दर नितीचे उद्देश सांगा.

७. अधिकोष दर नितीच्या मर्यादा सांगा.

८. खुल्या बाजाराचे व्यवहार म्हणजे काय?

९. खुल्या बाजारातील व्यवहारांच्या मर्यादा सांगा.

६. निवडक किंवा गुणात्मक प्रत्यय नियंत्रण म्हणजे काय?

७. गुणात्मक प्रत्यय नियंत्रणाची साधने कोणती?